## महत्त्वाचे

### पारनेर येथे उद्या ‘ई-नाम’ प्रशिक्षण

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** येथील कृषि उत्पन्न बाजार समिती व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्यावतीने राष्ट्रीय कृषि बाजार ई-नामचे मार्गदर्शन प्रशिक्षण उद्या (दि.१५) दुपारी १२ वाजता मुख्य बाजार आवार, पारनेर येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती सभापती किसनराव रासकर यांनी दिली. प्रा. रंगनाथ कटरे मार्गदर्शन करणार आहेत. तालुक्यातील शेतकरी, व्यापारी, अडते, अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून या प्रशिक्षणाचा तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधव, विविध कार्यकारी सेवा संस्थेचे पदाधिकारी, व्यापारी, अडते यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संचालक मंडळाने केले आहे.

### बेवारस महिलेचा मृतदेह आढळला

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** अहिल्यानगर-पुणे महामार्गालगत पवारवाडी घाटातील मंदिराजवळ गुरुवारी (दि.१२) एका महिलेचा मृतदेह आढळला आहे. याबाबत संतोष श्रीकांत पवार (रा. पवारवाडी, सुपा यांनी सुपा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, गुरुवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अहिल्यानगर-पुणे महामार्गालगत सूपा येथील पवारवाडी परीसरातील तीन जैन मंदीरामध्ये अंदाजे वय ४५ असलेल्या महिलेचा मृतदेह आढळला आहे. घटनेची माहिती मिळताच सुपा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या महिलेबाबत माहिती असल्यास सुपा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. अधिक तपास सहायक पोलिस निरिक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार रियाज पटेल करत आहेत.

### शिरूर आगाराच्या ताफ्यात ५ नवीन बसेस


**शिरूर (तालुका प्रतिनिधी)–** शिरूर बस आगारासाठी आलेल्या पाच नवीन एसटी बसेसचे पूजन शिरूर हवेलीचे आमदार माऊली आबा कटके यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी आगारप्रमुख मनिषा गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल, दादासाहेब कोळपे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रविंद्र काळे, भाजपाचे शिरूर तालुकाध्यक्ष राहुल पाचर्णे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शशिकांत दसगुडे, माजी उपनगराध्यक्ष जाकिर पठाण, सामाजिक कार्यकर्ते प्रितिश फुलडाळे, आमदाबादचे माजी सरपंच प्रकाश थोरात, भाजपाच्या शिरूर शहर महिलाध्यक्षा प्रिया बिरादार, उपाध्यक्षा सुष्टी करंजुले, राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षा श्रृतिका झांबरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिरूर शहराध्यक्ष शरद कालेवार, शिवसेना महिला शहराध्यक्षा सुजाता पाटील, श्रीराम सेनेचे सुनिल जाधव, अविनाश मल्लाव, भाजपाचे बाबुराव पांचगे, राजेंद्र महाजन, विजय नरके, निलेश नवले आदी उपस्थित होते. आभार माधव मुंडे यांनी मानले.

### आमदार बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ शेवगावात अनोखे आंदोलन



**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी तसेच दिव्यांगांना मानधन सुरू करण्यात यावे या मागणीसाठी प्रहारचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू हे अमरावतीतील माझोरी येथील संत गाडगेबाबा समाधी जवळ गेल्या सहा दिवसांपासून बेमुदत उपोषणास बसले आहेत. त्यांच्या आंदोलनास पाठिंबा म्हणून शेवगाव तालुक्यातील प्रहार संघटनेचे अध्यक्ष राम शिदोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.१३) शेवगाव तहसील कार्यालयात म्हशीचे हेलगे आणून अनोखे आंदोलन करण्यात आले. शहरातील संत गाडगेबाबा चौकातून हे आंदोलन सुरू करून शेवगाव तहसील कार्यालयावर नेण्यात आले. यावेळी पदाधिकारी व शेतकऱ्यांनी सरकार विरोधी घोषणाबाजी करून परिसर दणाणून गेला. प्रभारी तहसीलदार दीपक कारखिले यांनी निवेदन स्वीकारले. हे अनोखे हटके आंदोलन नागरिकांच्या चर्चेचा व कुतूहलाचा विषय ठरले.प्रहार संघटनेचे शेवगाव तालुका अध्यक्ष राम शिदोरे, महिला तालुका अध्यक्ष लक्ष्मी देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसान, माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे तालुकाप्रमुख अविनाश मगरे, वंचित बहुजन पार्टीचे तालुका अध्यक्ष प्यारेलाल शेख, भायगाव सरपंच राजू आढाव, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मच्छिंद्र आर्ले, बाळासाहेब धोंडे, आप्पासाहेब जगदाळे, भाऊसाहेब शिरसाठ, राहू कोळी, वामन सौदागर, लहू भवर, बाबा मिय्या सय्यद, किशोर पवार, सिताराम शिंदे, अविनाश देशमुख आदी उपस्थित होते.

### पोलीस निरीक्षक मुटकुळे यांचे स्वागत



**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)–** एक उत्कृष्ट सायकलपटू असलेले व शेवगाव पोलीस ठाण्यात नव्याने नियुक्त झालेले पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांचे शेवगाव सायकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. तसेच आषाढी एकादशीनिमित्त शेवगाव ते पंढरपूर सायकल वारीचे निमंत्रणही दिले. यावेळी शेवगाव सायकल असोसिएशनचे अध्यक्ष विनोद ठाणगे, भागिनाथ काटे, वसंत सुरवसे, सचिव कैलास जाधव, डॉ.योगेश फुंदे, डॉ.प्रदीप उगले, डॉ. मुकुंद दारकुंडे, निलेश केवळ, आबासाहेब नेमाणे, समन्वयक डॉक्टर संदीप बोडखे आदी उपस्थित होते.

# गुंतवणुकदारांना फसवून संचालक दुबईला

## ■ कोट्यवधीचा चुना लावणाऱ्या कंपनीकडून बनवाबनवी सुरुच

**श्रीगोंदा (प्रतिनिधी)–** शेअर मार्केटमध्ये जास्त परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून श्रीगोंदा, पारनेर, नगरच्या गुंतवणूकदारांची कोटयवधींची फसवणूक करणाऱ्या एका मल्टिपर्पज अर्बन निधी लिमिटेड कंपनीच्या मुख्य प्रवर्तकासह काही संचालक दुबईला गेले असल्याची माहिती कंपनीच्या एजंटने दिली. दुसरीकडे पैसे दिलेल्या मुदतीत परत न मिळाल्याने गुंतवणूकदार हैराण झाले आहेत.

फसवणूक झाल्याचे समजताच गेल्या दोन-तीन महिन्यांपासून गुंतवणूकदारांनी पैसे परत घेण्यासाठी तगादा सुरु केला आहे. मात्र, कंपनीकडून संदिग्ध माहिती देण्यात येत असून केवळ बनवाबनवी सुरु असल्याने गुंतवणूकदार धास्तावले आहेत. गुंतवणूकदारांच्या तगाद्यानंतर कंपनीने नवीन ॲप लाँच करत १५ जूनपासून पैसे ॲपच्या माध्यमातून विड्रॉल करता येतील असे आश्वासन दिले. परंतू आता पैसे विड्रॉल करण्यासाठी आता आणखी तीन महिने लागणार असल्याची माहिती एंजटने दिली असून कंपनीने पुन्हा एकदा गुंतवणूकदारांना गाजर दाखवले आहे. एका मल्टिपर्पज अर्बन निधी लिमिटेड कंपनीने




सुरुवातीला गुंतवणूकदारांना शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवले असल्याचे सांगत ठेवीवर महिन्याला १० ते १२ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवले. महिन्याला लाख रुपयांना दहा ते बारा हजार परतावा देवून विश्वास संपादन केला. त्यामुळे कंपनीत गुंतवणूकदारांची रीघ लागली. कुणी पदरचे पैसे गुंतवले, कुणी जास्त परतावा मिळतो म्हणून कर्ज काढले, जमिनी,जागा विकून पैशांची गुंतवणूक केली. वेळप्रसंगी सावकार, बँकेकडूनकडून कर्ज काढून कंपनीमध्ये पैसे गुंतवले. अनेकांनी कोट्यवधी रुपयांच्या ठेवी कंपनीकडे जमा केल्या त्यासाठी एजंट आणि व्यवसाय भागीदारांना भरघोस कमिशन देण्यात आले. आता, गेल्या दोन-तीन महिन्यांपासून वारंवार मागणी करुनही कंपनीकडून गुंतवणूकदारांना पैसे मिळत नसून दिशाभूल केली जात आहे. कंपनीने पैसे परत मागणाऱ्या गुंतवणूकदारांना सुरुवातीला पैसे शेअर मार्केटमध्ये गुंतवले असल्याचे सांगितले. त्यानंतर एका दुसऱ्याच कंपनीत परस्पर पैसे वळविल्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर पुन्हा कंपनीकडून गुंतवणूकदारांना पैसे ॲपच्या माध्यमातून देण्यात येणार असल्याचे सांगत वेळ मारून नेण्यात येत आहे.

> ▸ शेअर बाजार, जादा परतावा आणि ग्लोबल ट्रेडिंग असे वेगवेगळे फंडे वापरुन गुंतवणूकदारांची दिशाभूल करणाऱ्या कंपनीने गाशा गुंडाळला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे गुंतवणूकदारांना अडचणीत आले आहेत. दरम्यान, कंपनीचे नवे ॲप आणि वेबसाईट अद्याप सुरु असून वेबसाइटवर गुंतवणूकदारांचे पैसे दिसत आहेत. पैसे विड्रॉल मात्र करता येत नाहीत, त्यामुळे गुंतवणूकदार हतबल झाले आहेत. ॲपमध्ये गुंतवणूकदारांचे पैसे युरो आणि डॉलरमध्ये रूपांतरित केले असल्याचे दिसते. मात्र, फॉरेन करन्सीबाबत असणारे नियम अनेकांना माहित नाहीत. नेमका काय प्रकार सुरु आहे हे समजत नसल्याने सध्यातरी गुंतवणूकदार किमान मुद्दल तरी परत मिळेल या आशेने मोबाईल ॲप उघडून पाहत आहेत.

## डिकसळचे सरपंच चौधरी अपात्र

### नाशिकच्या अपर विभागीय आयुक्तांचा आदेश

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील डिकसळ येथील सरपंचांना ३ अपत्ये असल्याच्या कारणावरून अपात्र ठरविण्यात आले आहे. सरपंच भाऊसाहेब बाबाजी चौधरी यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व तिसऱ्या अपत्यामुळे नाशिकचे अपर विभागीय आयुक्त अजय मोरे यांनी बुधवारी (दि.४) अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला अपात्रतेच्या आदेशात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढत अपात्रतेचा निर्णय कायम ठेवला आहे.

याबाबत अरुण काकडे यांनी पुराव्यानिशी निवडणूक शाखेकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी २३ सप्टेंबर २०२४ रोजी तिसऱ्या अपत्यावरून सरपंच भाऊसाहेब चौधरी यांना चौकशीअंती अपात्र ठरविले होते. चौधरी यांना ऑगस्ट २०२३ मध्ये तिसरे अपत्य जन्माला आले होते. याबाबतची तक्रार काकडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी होऊन चौकशीनंतर तत्कालीन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी कायद्यानूसार सरपंच चौधरी यांच्यावर अपात्रतेची कारवाई केली होती. यानंतर चौधरी यांनी आदेशावर ७ ऑक्टोबर २०२४ रोजी अपर विभागीय आयुक्तांकडे अपील केले होते. यावर वेळोवेळी सुनावणी झाली. त्यानंतर अपर विभागीय आयुक्तांनी आदेश कायम ठेवला आहे. दरम्यान, सरपंच चौधरी यांनी सरकारची फसवणूक केली असून, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा व त्यांच्या स्वाक्षरींचे अधिकार काढून घ्यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अरुण काकडे यांनी केली आहे.

## महिलांचे आर्थिक सक्षमीकरण काळाची गरज

### हेरंब कुलकर्णी; पाथर्डीत महिला मेळावा

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)–** एखाद्या कुटुंबातील महिला जर कमावती असेल, तर त्या कुटुंबाची होरपळ होत नाही. त्यामुळे महिला आर्थिक सक्षम होणे ही काळाची गरज असल्याचे मत एकल महिला समितीचे प्रमुख हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केले. हिरकणी लोकसंचलीत साधन केंद्र आणि पाथर्डी तालुका एकल महिला समितीच्यावतीने आयोजित महिला मेळाव्यात ते बोलत होते.

यावेळी किसन आव्हाड, पोपट फुंदे, भारती असलकर, राजेंद्र सावंत, सुनील पाखरे, हिरा माळवे उपस्थित होते. कुलकर्णी म्हणाले, करोना काळात नव्वद हजार महिला विधवा झाल्या. सरकारने एकल महिलांचे सर्वेक्षण करण्याची गरज आहे. आम्ही सध्या ऐंशी तालुक्यात काम करीत आहोत. महिलांना रोजगार



निर्मिती करण्यासाठी काम सुरू आहे. बाल संगोपन योजनेतून एक लाख दहा हजार मुलांना आर्थिक लाभ मिळत आहे. संजय गांधी निराधन योजनेतून महिलांना आर्थिक मदत केली जाते. पाथर्डी तालुक्यात तेरा हजार एकल महिला आहेत. त्यांच्या मुलांची शिक्षणाची जबाबदारी घेणारे अनेक दाते आहेत. त्यासाठी तालुका पातळीवर समिती गठीत करून मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करणाऱ्यांना दात्यांमध्ये आणि मुलांमध्ये समन्वय साधण्याचे कामही समिती तालुक्यात करील. सरकारी योजनांसोबतच महिलांना स्वतःचा रोजगार उभा करण्यासाठी आम्ही थेट मदतीचा हात देणार आहोत. कौटुंबिक अर्थशास्त्र स्त्रियांच्या हाती अधिक सुरक्षित राहते. प्रास्ताविक किसन आव्हाड यांनी केले. आभार भारती असलकर यांनी मानले.

> **शासनाने उपाययोजना करावी**
>
> ▸ एकल महिलांचे प्रश्न दिवसागणिक वाढत आहेत. महिलांना मानसिक, भावनिक आणि सामाजिक आधार देण्यासाठी शासनाकडून विविध पातळ्यांवर उपाययोजनांची आवश्यकता आहे. स्त्रियांच्या हतबलतेमुळे आणि असुरक्षिततेमुळे सामाजिक गुन्हेगारी वाढते, आणि या गुन्हेगारीचे थेट परिणाम कुटुंब व्यवस्थेवर होतात. यासाठी उत्पन्नाचे शाश्वत स्रोत आणि सामाजिक अधिकाराची भक्कम साथ अशा महिलांमागे उभी राहिल्यास समाजाची निकोप आणि सुरक्षित वाढ निश्चित होईल, असे ते म्हणाले.

## विविध मागण्यांसाठी आरपीआयचे सोमवारी आंदोलन

**कर्जत (तालुका प्रतिनिधी)–** विविध मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्यावतीने कर्जत पंचायत समितीत सोमवारी (दि. १६) जागरण गोंधळ, कीर्तन, ढोल बजाओ असे आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती पक्षाचे उत्तर महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अंकुश भैलुमे व युवक जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकडे यांनी निवेदनाद्वारे दिली.

निवेदनात म्हटले आहे, कर्जत पंचायत समितीमध्ये विविध न्याय हक्कांसाठी व सर्व पंचायत समितीच्या विभागांची चौकशी करण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. यामध्ये सन २०२३-२४ मध्ये तालुक्यात झालेल्या विहिरीच्या प्रस्तावाची झालेल्या तपासणीचा सर्व अहवाल मिळावा. यामध्ये जोशी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणत्या पद्धतीची कारवाई करण्यात आली याबाबतही माहिती देण्यात यावी. सिंचन विहिरीचे जिओ टॅग व स्थळ पाहणीचे फोटो. याच प्रमाणे पशुसंवर्धन विभागाच्या मार्फत गाय गोठ प्रकरण करण्यासाठी जनावरांसाठी देण्यात आलेले दाखले व त्याचे जिओ टॅग फोटो याची माहिती मिळावी. याशिवाय, क्रेनच्या मदतीने न खोदलेल्या विहिरींची माहिती व त्यावरील मजुरांची यादी मिळावी. ज्या ठिकाणी मजूर न लावता मशीनच्या साह्याने खोदकाम केले आहे, त्या विहिरींची चौकशी करून दोषी अधिकारी कर्मचारी यांच्यावर काय कार्यवाही करण्यात आली याचा अहवाल मिळावा. तालुक्यात झालेले सर्व पानंद रस्ते, त्यासाठी आलेला निधी, तसेच किती पानंदरस्त्यांचे काम सुरू झाले आहे, पूर्ण झालेले रस्त्यांची माहिती यामध्ये मजुरांच्या वापरासह मशीनद्वारे काम करण्यात आले आणि मजुरांचे जिओ टॅग फोटो याबाबत सर्व माहिती मिळावी. याशिवाय, नवबौद्ध समाजाला मिळणाऱ्या विविध शासकीय योजना तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत व नगरपंचायत यांनी मागासवर्गीयांसाठी १५%, ३%, १०% हा निधी खर्च केला आहे का? केला असल्यास, त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. अनेक ठिकाणी हा निधी खर्च करण्यात आलेला नाही, यामुळे संबंधित ग्रामपंचायतीच्या विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्यावर कारवाई केली आहे का? नसेल तर त्याची माहिती देण्यात यावी. यासह विविध मागण्यांसाठी या आंदोलन करण्यात येणार असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

## रस्ता खोदल्याने वाहतुकीचे तीनतेरा

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील निघोज परिसरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या वेगाने सुरू असून, ठेकेदाराने अनेक ठिकाणी रस्ता खोदून ठेवला आहे. मात्र, त्यामुळे वाहतूकीचे तीनतेरा वाजले असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्याच्या साईड पट्ट्यांवर ठिकठिकाणी टाकलेली काळी माती व पावसामुळे तयार झालेल्या चिखलात वाहने अडकल्याने नुकसान होते. खोदलेल्या जागांवर रात्रीच्या वेळी दुर्घटना टाळण्यासाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था, फलक अथवा बॅरिकेडिंग केलेले नाही. केवळ तात्पुरते पर्यायी मार्ग काढून देण्यात आले असून, त्यांचीही अवस्था अत्यंत खराब आहे.

## बिबट्यांनी पाडला १३ गायींचा फडशा

### भटेवाडी येथील गोशाळा परिसरात भीतीचे वातावरण



**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील करंजी येथील भटेवाडी येथे सामाजिक कार्यकर्ते छानराज क्षेत्रे यांची तथागत देशी गायींची गोशाळा असून डोंगराच्या पायथ्याशी ही गोशाळा असल्यामुळे या डोंगर परिसरात नेहमी बिबट्याचा वावर असतो. या गोशाळेमध्ये सद्यस्थितीत ६७ गायी असून मंगळवारी (दि.१०) मध्यरात्री गोशाळेतील एका गाईवर बिबट्याने हल्ला केल्याने गाईचा जागीच मृत्यू झाला.

मागील दोन वर्षात या गोशाळेतील १३ गायींवर बिबट्यांनी हल्ला करून त्यांचा बळी घेतला आहे. भटेवाडी परिसरात बिबट्याचे वास्तव्य असून वन विभागाने पिंजरा लावून त्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्याची ग्रामस्थांची मागणी आहे यासंदर्भात क्षेत्रे यांनी अनेक वेळा वन विभागाशी पत्रव्यवहार देखील केला. दोन वर्षात १३ गायीचा बिबट्याच्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाला मात्र एकदाही वन विभागाने क्षेत्रे यांना नुकसान भरपाई दिलेली नाही. गाईंवर हल्ला झाल्यानंतर बिबट्याचे ठसे, इतर अनेक महत्त्वाचे पुरावे वन विभागाकडे सादर केले मात्र वन विभागाने कायम वेळ मारून नेण्याचे काम केले. प्रत्यक्षात मात्र क्षेत्रे यांना अद्याप एकदाही मदत झालेली नाही त्यामुळे एवढी मोठी संख्या असलेल्या गायी पदरमोड करून आणखी किती दिवस सांभाळायच्या. स्वखर्चातून क्षेत्रे या गायी गेल्या अनेक वर्षापासून सांभाळात आहेत मात्र बिबट्याच्या हल्ल्यामुळे या गायीची सुरक्षा धोक्यात आली आहे.

> ▸ गेल्या दहा वर्षापासून पदरमोड करून गोशाळाच्या माध्यमातून देशी गायीचे स्वखर्चातून संगोपन केले जात आहे.मात्र जंगल परिसरात भटकंती करणाऱ्या बिबट्याने दोन वर्षात १३ गायीची शिकार केली यामुळे मोठ्या वेदना होत असून वन विभागाने वेळीच पिंजरा लावून पकडले असते तर मंगळवारी गोशाळेतील गायीचे प्राण वाचले असते वन विभागाच्या नकारात्मक भूमिकेमुळे गोमातेच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.
>
> **–छानराज क्षेत्रे**
> (सामाजिक कार्यकर्ते, करंजी)

# सावकाराच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

## पाथर्डीतील धायतडकवाडी येथील घटना; मृत्यूपूर्वी लिहिली चिठ्ठी

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)–** पाथर्डी तालुक्यातील धायतडकवाडी येथील गरडवस्तीवरील रहिवाशी बाबासाहेब नामदेव धायतडक (वय ४६) यांनी सावकाराच्या मानसिक छळाला कंटाळून गुरुवारी (दि.१२) आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी मयत बाबासाहेब धायतडक यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत बाळासाहेब बबन गर्जे (रा. अकोला, ता. पाथर्डी) याने वेळोवेळी दमदाटी व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे नमूद केले आहे.

मयत बाबासाहेब धायतडक यांचा मुलगा सचिन बाबासाहेब धायतडक यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, त्यांच्या वडिलांनी एक वर्षांपूर्वी म्हशी घेण्यासाठी बाळासाहेब बबन गर्जे याच्याकडून १० टक्के व्याज दराने ६ लाख रुपये घेतले होते. त्यापैकी ५ लाख रुपये त्यांनी व्याजासह परत केले होते. मात्र



तरीही बाळासाहेब बबन गर्जे यांनी आणखी ५ लाख रुपयांची अवास्तव मागणी करत सातत्याने धमकी देण्यास सुरुवात केली.

११ जून रोजी गर्जे यांनी सार्वजनिकरित्या वडिलांना अपमानित करत शिवीगाळ केली व पैसे दे नाहीतर तुझी जमीन माझ्या नावावर कर अशी धमकी दिली. दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार, १२ जून २०२५ रोजी सकाळी बाळासाहेब बबन गर्जे याचा पुन्हा फोन आला आणि पाथर्डी येथील कोरडगाव चौकात येण्यास सांगितले. त्यामुळे मानसिक तणावात असलेल्या बाबासाहेब धायतडक यांनी सकाळी ९.३० वाजता घरातून निघून आपल्या शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेत आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी त्यांनी गावातील व्यक्तींना व्हॉट्सपवर एक चिठ्ठी पाठवली होती, ज्यात बाळासाहेब बबन गर्जे यांच्या धमक्यांना कंटाळून आत्महत्या करीत आहे असे लिहिले होते. ‘बाळासाहेब आज दहा वाजता पाथर्डी कोरडगाव चौकात हाणार होता (मारहाण करणार होता)’, म्हणून आत्महत्या करीत आहे असे त्यांनी चिठ्ठीत लिहिले आहे.

गुरुवारी सायंकाळी पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर आरोपीवर गुन्हा दाखल करून अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही असा आक्रमक पवित्रा नातेवाईकांनी घेतल्यानंतर बाळासाहेब बबन गर्जे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर शुक्रवारी सकाळी अत्यंत शोकाकुल वातावरणात बाबासाहेब धायतडक यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाठीमागे आई, पत्नी, एक विवाहीत आणि अविवाहित मुलगी तसेच दोन अविवाहीत मुले असा परिवार आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी करीत आहेत.